www.attalmat.com

# अट्टल मत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१८, अंक-४७ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. ११ ऑगस्ट २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४

## शालार्थ आयडी घोटाळ्यात तीन शिक्षकांना अटक; १०० कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा ठपका

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

पदाचा गैरवापर करीत राज्य सरकारची १०० कोटी रुपयांची फसवूणक केल्याचा ठपका ठेवत अटक केली. विशेष तपास पथकाने दिग्रस तालुक्यातील एक सहाय्यक शिक्षक, नागपुरच्या दिघोरीतील आदर्श शाळेच्या सहाय्यक शिक्षिका आणि म्हाळगी नगरातल्या विद्याभूषण शाळेच्या सहाय्यक शिक्षिका या तिघांना अटक केली.

सध्या राज्यभर गाजत असलेल्या बनावट शालार्थ आयडी घोटाळ्याची पाळेमुळे रोजच लांबताना दिसत आहेत. आतापर्यंत या घोटाळ्यात अधिकारी, संस्था चालकांना अटक करण्यात आली आहे. आता मात्र थेट लाभार्थी शिक्षकांना अटक केल्याने शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. बनावट शालार्थ ओळखपत्रावरून शिक्षक बनून पगार लाटला (Earned salary by becoming a fake teacher) असल्याचा आरोप ठेवत, तीन शिक्षकांना सायबर शाखेच्या विशेष तपास पथकाने अटक केली आहे. यामध्ये दोन महिला सहाय्यक शिक्षिकांसह एका सहाय्यक शिक्षकाचा समावेश आहे.

'एलएलबी'ची उद्या अंतिम गुणवत्ता यादी जाहीर होणार..

बनावट शालार्थ आयडी प्रकरणात रोहिणी विठोबा कुंभार (माध्यमिक)




आणि सिद्धेश्वर श्रीराम काळुसे (प्राथमिक) या शाळांनी पदाचा गैरवापर करीत राज्य सरकारची १०० कोटी रुपयांची फसवूणक केल्याचा ठपका ठेवत अटक केली. विशेष तपास पथकाने दिग्रस तालुक्यातील एक सहाय्यक शिक्षक, नागपुरच्या दिघोरीतील आदर्श शाळेच्या सहाय्यक शिक्षिका आणि म्हाळगी नगरातल्या विद्याभूषण शाळेच्या सहाय्यक शिक्षिका या तिघांना अटक केली.

या तिघांनीही बनावट शालार्थ ओळखपत्राच्या आधारे नियुक्ती मिळवत वेतनापोटी २५ लाख रुपये लाटले. त्यामुळे राज्य शासनाची फसवणूक झाल्याच्या आशयाची तक्रार विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी रविंद्र पाटील यांनी दिली होती. त्या आधारे तपास पथकाने केलेल्या चौकशीत या तिघांनी बनावट शालार्थ ओळपत्राद्वारे नियुक्ती मिळिवल्याचे सिद्ध झाले. फसवणूकीत स्पष्ट सहभाग आढळल्याने एसआयटीने त्यांना अटक केली.

बनावट शालार्थ ओळखपत्र घोटाळा प्रकरणात विशेष तपास पथकासह सायबर शाखा समांतर तपास करीत आहे. या दोन्ही पथकांनी आतापर्यंत २६ जणांना अटक केली आहे. त्यापैकी एकट्या एसआयटीच्या ताब्यातील अटकेची संख्या आता १७ झाली आहे. यात ३ विभागीय शिक्षण उपसंचालक, ३ शिक्षणाधिकारी, ४ लिपीक, २ मुख्याध्यापक आणि २ शाळा संचालकांचा समावेश आहे. यात आता आणखी ३ शिक्षकांची भर पडली आहे. त्यामुळे अटकेतील आरोपींची संख्या आता २९ झाली आहे.

## सणासुदीच्या काळात छोटे व्यापारी ठरतात सायबर फसवणुकीचे बळी

**मुंबई:** सणासुदीच्या काळात छोट्या व्यवसायांच्या विक्रीत वृद्धी होते, पण सायबर फसवणुकीचा धोका देखील वाढतो. या काळात कर्मचारी कमी असतात आणि ऑर्डर वाढलेल्या असतात. याचा च फायदा स्कॅमर्स घेतात.

बनावट पेमेंट्स, फिशिंग लिंक्स आणि अर्जंट डिलिव्हरीचे बहाणे वापरून ते सणासुदीचा फायदा घेत असल्याचे एक्सप्रेस वाहतूक कंपनी फ ेडएक्सने सांगितले. भारतीय संगणक आपत्कालीन प्रतिसाद संघटना आणि डेटा सिक्युरिटी कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या मते गेल्या वर्षी ७४% सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एसएमईज) किमान एका सायबर हल्ल्याचे बळी ठरले आहेत. सणासुदीच्या काळात स्कॅमर्स छोटे व्यवसाय टार्गे ट करण्याचे नवनवीन फंडे वापरत असल्याकडे फेडएक्सने लक्ष वेधले. स्कॅमर्स खरेदीदार असल्याचं भासवत बनावट पेमेंट रिसीट पाठवतात. पेमेंट न करता माल मिळवण्याचा ते प्रयत्न करतात. इमेलद्वारे पुरवठादार असल्याचं भासवून बँक खात्याचे तपशील बदलण्यास सांगतात. बनावट डिलिव्हरी मेसेज किंवा कॉल करून सिस्टिममध्ये ॲ क्सेस मिळवतात.

## महसूल सप्ताह समारोप चांगल्या कामातून करा विभागाचे प्रतिमा संवर्धन- विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

लोकांना सेवा देणे हे आपले आद्यकर्तव्य आहे. विभागाचे म्हणून काही विषय आहेत. याबाबत शासनस्तरावर धोरणात्मक निर्णय वेळोवेळी होत असतात. हे निर्णय विभागाच्या आणि कर्मचारी अधिकारी यांच्या हिताचेच असतात. आपण चांगले काम करुन लोकांना सेवा द्यावी व आपल्या विभागाचे प्रतिमा संवर्धन करावे,असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांना केले.

दैनंदिन कार्यालयीन कामकाज,सेवा, कर्तव्य बजावतांना आपण आपले ज्ञान अद्यावत करत राहणे आवश्यक आहे. अद्यावत ज्ञान केल्यास आपण लोकांना चांगली सेवा देऊ शकतो, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले. महसूल सप्ताहाचा आज समारोप झाला. त्यानिमित्त एमजीएम विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात समारोप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यास विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, कुलगुरु डॉ.विलास सपकाळ, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मुख्य प्रशासकीय अधिकारी सिडको जगदीश मिणीयार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी डॉ. सुचिता शिंदे, संगिता राठोड, संगिता सानप, एकनाथ बंगाळे, डॉ. अरुण जऱ्हाड, संतोष गोरड तसेच सर्व तहसिलदार, कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी अनिल सुर्यवंशी, परेश खोसरे, देविदास जरारे, विद्याचरण कडवकर, स्वरुप कंकाळ आदी उपस्थित होते.

कुलगुरु डॉ. सपकाळ यांनी सांगितले की, सेवा काळात वाचन आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालून आपण स्वतःचे ज्ञान अद्यावत करावे. बहुविध पद्धतीची कामगिरी आपणास करणे सहज शक्य होते.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, आपल्या विभागामुळे आपल्याला ओळख नाव मिळते. प्रतिष्ठा मिळते. ती प्रतिष्ठा लोकांना चांगल्या प्रकारे सेवा देऊन आपण वाढविली पाहिजे. त्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन, वाचन, आरोग्य विषयक जागरुकता राखणे आवश्यक आहे.

विभागीय आयुक्त पापळकर म्हणाले की, शासनाने आता अनेक विषयात धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. कृत्रिम वाळू धोरण हे अशाच प्रकारचे धोरण आहे. लोकांना स्वस्तात वाळू उपलब्ध करुन दिल्यास हा प्रश्न निकाली निघेल. जगाच्या प्रगतीबरोबर आपल्यालाही जुळवून घ्यावे लागेल. त्यासाठी स्वतः चे ज्ञान अद्यावत ठेवावे. विभागाची प्रतिमा उंचवावी,असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक जनार्दन विधाते यांनी केले.यावेळी महसूल अधिकारी- कर्मचाऱ्यांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला. सर्व म हसूल कर्मचारी अधिकारी यावेळी उपस्थित होते.

## स्कूलबस चालकानंतर आता रिक्षा चालकाचा आठवीच्या विद्यार्थिनीला अश्लील स्पर्श

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

स्कूल बसचालकाने ९ वर्षांच्या मुलीचा विनयभंग केल्याची घटना समोर आल्यानंतर त्याच दिवशी एका रिक्षाचालकाने मागील सीटवर बसून ८ वीतील १३ वर्षांच्या मुलीचा विनयभंग केल्याचे समोर आले. हा प्रकारदेखील ३० जुलै रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास टीव्ही सेंटर भागात घडला.

या प्रकरणी संतोष मधुकर ठाकरे (४६, रा. एन-१३, हडको) याच्यावर सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यास अटक करून त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आल्याची माहिती निरीक्षक कुंदनकुमार वाघमारे यांनी दिली. १३ वर्षीय वंशिका (नाव बदलले) ही इयत्ता आठवीमध्ये शिक्षण घेते. तिची शाळा सुटल्यावर तिला वेगळ्या ॲक्टव्हिटीचे क्लासेस लावलेले होते. तेथून घेऊन जाण्यासाठी स्वतः पालक जायचे.

मात्र ३० जुलैला वंशिकाचा शाळेसाठीचा रिक्षाचालक संतोष याने तिच्या वडिलांना फोन करून तिला घेऊन येऊ का, असे विचारले. नेहमीचाच चालक असल्याने त्यांनी त्यास होकार दिला आणि नराधम चालकाचा डाव यशस्वी झाला. त्याने टीव्ही सेंटर भागातील एका उद्यानाच्या समोर भरवस्तीमध्ये रिक्षा थांबवली. त्यानंतर तो मागच्या सीटवर आला. तेथे त्याने तिला अश्लील पद्धतीने स्पर्श केला. त्यावर वंशिकाने रडवल्या स्वरात 'मी माझ्या पप्पांना सांगेन. असे काही करू नका,' अशी बोलली. त्यामुळे घाबरलेल्या रिक्षाचालकाने तिला थेट घरी आणून सोडले.

**घाबरलेली दिसल्याने आईने दिला विश्वास**

शाळेतून येताना नेहमी उत्साही असणारी वंशिका काहीशी निराश आणि घाबरलेली दिसली. त्यामुळे आईने तिला जवळ घेऊन विश्वास देऊन याबाबत विचारणा केली तरीदेखील वंशिका काहीही न बोलल्याने आईचा संशय बळावला. त्यामुळे त्यांनी अधिक विश्वासात घेऊन विचारल्यावर तिने सर्व प्रकार सांगितला. त्यामुळे धक्का बसलेल्या आईने पतीला हा प्रकार सांगितला. त्या दांपत्याने आरोपीला फोन करून उद्यापासून वंशिका तुमच्या रिक्षाने येणार नाही अशी माहीती दिली. मात्र अखेर विचाराअंती त्यांनी सिडको ठाण्यात गुन्हा दाखल केला.

## छत्रपती संभाजीनगरचा अभिमान! मंगेश शिवाजी जाधव यांना राष्ट्रपतींकडून सुवर्ण पदकाचा सन्मान





**उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून मंगेश जाधव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर येथील सिडको पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार व माजी सैनिक श्री. शिवाजी तुळशीराम जाधव यांचे पुत्र मंगेश शिवाजी जाधव यांनी देशाच्या शैक्षणिक क्षेत्रात मोठा ठसा उमठवला आहे. झारखंडमधील प्रतिष्ठित IIT (ISM) धनबाद या संस्थेच्या मानविकी व सामाजिक शास्त्र विभागात त्यांनी उल्लेखनीय अकादमिक कामगिरी केल्यामुळे त्यांना सुवर्ण पदकाने सन्मानित करण्यात आले आहे.

हे पदक भारताच्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले असून, हा सन्मान केवळ मंगेश जाधव यांच्याच नव्हे तर छत्रपती संभाजीनगर शहराचा, महाराष्ट्राचा आणि त्यांच्या कुटुंबाचा गौरव वाढवणारा आहे. मंगेश जाधव यांचे हे यश त्यांच्या अथक मेहनतीचे, समर्पणाचे आणि शैक्षणिक उत्कर्षाचे जिवंत उदाहरण असून अनेक तरुणांसाठी प्रेरणादायक ठरणारे आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून मंगेश जाधव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

संपादकीय

# रेल्वे प्रकल्पामुळे मराठवाड्याचा विकास प्रगतीकडे जाणार

व्यापारासाठी लागणाऱ्या मालाची ने-आण करण्यासाठी जवळचा मार्ग तयार होईल. तसे पाहिले तर मराठवाड्याच्या या मागण्या गेल्या २०-२५ वर्षांपासून सुरू आहेत; परंतु २०१४ मध्ये केंद्रात भाजपचे सरकार आल्यानंतर मराठवाड्याच्या रेल्वेविषयक विकासाला अधिक चालना मिळाली.

भाजपच्या काळात मराठवाड्याला रेल्वे प्रकल्पांच्या बाबतीत भरभरून प्रतिसाद व सहकार्य मिळत आहे. भाजपने दुर्लक्षित मराठवाड्याकडे व प्रलंबित रेल्वे प्रकल्पांच्या बाबतीत विशेष लक्ष घालून येथील अनेक प्रश्न मार्गी लावले. भाजपकडून रेल्वेच्या बाबतीत मराठवाड्यासाठी पुन्हा एक आनंदवार्ता आली. परभणी ते छ. संभाजीनगर रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाला मंजुरी मिळाली आहे. १७७.२९ कि.मी.च्या रेल्वेमार्गासाठी २ हजार १७९ कोटींचा निधीही मंजूर करण्यात आला. अंकाई (मनमाड) ते छ. संभाजीनगर दरम्यान रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाचे काम सध्या सुरू आहे. केंद्र सरकारने छ. संभाजीनगर-परभणी दरम्यानच्या दुहेरीकरणाला मंजुरी दिल्याने मराठवाड्यासाठी उत्तर व दक्षिण भारताला जोडणारा जवळचा व वेगवान मार्ग तयार होणार आहे. आगामी तीन वर्षांत मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात प्रवासी व मालवाहतूक यामुळे वाढणार आहे. याबरोबरच तब्बल ७२.३४ कोटी रुपये खर्चून होणाऱ्या ३.२२ किलोमीटर अंतराच्या पूर्णा बायपास लाईनचा प्रकल्प मराठवाड्यातील रेल्वे वाहतूक आणि प्रादेशिक विकासासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. पूर्णा येथे होणाऱ्या नवीन स्टेशनवरही रेल्वे थांबणार आहेत. यामुळे पूर्ण शहर आणि जवळच्या गावांमधील प्रवाशांना लांब पल्ल्यांच्या रेल्वेमध्ये प्रवेश मिळणार आहे. रेल्वे बोर्डाने पूर्णा जंक्शनवरच एक नवीन बायपास बांधण्याचा निर्णय घेतला. तसेच स्टेशनजवळ एक नवीन पूर्णा रेल्वे स्टेशन उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे हे एक रेल्वेचे महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास येईल. मराठवाड्याच्या दृष्टीने पूर्णा रेल्वे स्टेशन अधिक गतिमान व रेल्वे ऑपरेशन्ससाठी महत्त्वाचे स्थान ठरणार आहे.

छ. संभाजीनगर ते परभणी दरम्यानच्या रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाला जेवढ्या लवकर पूर्ण करता येईल, तेवढ्या लवकर तो मार्ग पूर्ण होणे आवश्यक आहे. मराठवाड्यात मुदखेड ते परभणी या रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणासोबतच परभणी ते छ. संभाजीनगर या रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण चार वर्षांपूर्वीच होणे आवश्यक होते. तसे झाले असते तर चार वर्षांपूर्वीच कदाचित हे काम पूर्ण झाले असते. असो. 'देर आये दुरुस्त आये' या म्हणीप्रमाणे मराठवाड्याच्या दुहेरीकरणाचा हा प्रश्न एकदाचा मार्गी लागला. तत्कालीन रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्यामुळेच हा प्रश्न पूर्णपणे निकाली निघाला आहे. प्रत्यक्षात छ. संभाजीनगर ते मुदखेड हे अंतर ३०० कि.मी.पेक्षा जास्त असल्यामुळे एकाच टप्प्यात या रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाचा प्रश्न मार्गी लागू शकला नाही. त्यामुळे त्यांनी मंत्रिपदावर असताना अंकाई ते परभणी या रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणासाठी कामाचे दोन टप्पे पाडले. त्यानंतरच या रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाचा प्रश्न मार्गी लागला. मराठवाड्याच्या दृष्टीने हा एक मोठा टप्पा पार पडणार आहे. यासाठी ज्यांनी-ज्यांनी प्रयत्न केले त्या सर्वांचे मराठवाड्यात कौतुक होत आहे. विशेषतः तत्कालीन केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्यामुळेच मराठवाड्याला अच्छे दिन आले, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. आता

छ. संभाजीनगर ते अहिल्यानगर या रेल्वेमार्गाच्या कामाला गती देणे आवश्यक आहे. हा मार्ग पुण्याला जाण्यासाठी अगदी सोयीस्कर व जवळचा मार्ग ठरणार आहे. मराठवाड्यातील नांदेड, परभणी या दोन जिल्ह्यांतील नागरिकांना हा अतिशय जवळचा मार्ग ठरू शकतो. याबरोबरच वर्धा-नांदेड या रेल्वेमार्गाचे काम विदर्भाच्या भागातून पूर्ण होत आले आहे. म राठवाड्यातील हदगावपर्यंत हे काम लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने तातडीने पाऊल उचलणे गरजेचे आहे. बीड-अहिल्यानगर रेल्वेमार्गही अंतिम टप्प्यात आहे. या वर्षाच्या अखेरपर्यंत मराठवाड्यातून विदर्भ, उत्तर भारत, दक्षिण भारताला जोडणारे चांगले रेल्वेमार्ग पूर्णत्वाकडे जात आहेत. लवकरात लवकर या मार्गांवरून रेल्वे धावली तर मराठवाड्याच्या विकासाला अधिक चालना मिळणार आहे. केवळ रेल्वेतील प्रवाशांसाठी हा मार्ग सोयीचा ठरणार नसून या मार्गावरून उद्योग, व्यापारासाठी लागणाऱ्या मालाची ने-आण करण्यासाठी जवळचा मार्ग तयार होईल. तसे पाहिले तर मराठवाड्याच्या या मागण्या गेल्या २०-२५ वर्षांपासून सुरू आहेत; परंतु २०१४ मध्ये केंद्रात भाजपचे सरकार आल्यानंतर मराठवाड्याच्या रेल्वेविषयक विकासाला अधिक चालना मिळाली. त्यानंतर राज्यात भाजपच्या नेतृत्वाने मराठवाड्याच्या विकासाला झुकते माप दिले. मराठवाड्याचे ज्येष्ठ रेल्वे आंदोलक स्व. सुधाकरराव डोईफोडे यांनी या सर्व प्रलंबित रेल्वे प्रश्नांच्या म ागण्यांसाठी वारंवार आवाज उठवला होता. मराठवाडा व शेजारी असलेल्या तेलंगणा व कर्नाटकातील खासदार व राजकारणी मंडळींकडे अनेकदा यासाठी पाठपुरावा केला. केवळ एवढ्यावरच न थांबता थेट दिल्ली रेल्वेबोर्ड गाठत त्यांनी याबाबत अनेक मागण्या लावून धरल्या. आज मराठवाडा रेल्वे प्रश्नांच्या बाबतीत हळूहळू का होईना कात टाकत आहे. मराठवाड्यातील सर्वच रेल्वे प्रश्न सुटलेले आहेत, असे नसून अजूनही जे प्रलंबित मार्ग आहेत, त्यासाठी मराठवाड्यातील नेतृत्वाला प्रयत्न करणे आवश्यक आहे. हिंगोलीचे माजी खासदार हेमंत पाटील यांनी आदिलाबाद-माहूर-वाशिम या नवीन रेल्वे मार्गाच्या प्रस्तावासाठी शासनाकडे तसेच रेल्वे बोर्डाकडे सातत्याने पाठपुरावा केला. पोहरादेवी ते माहूरची रेणुका देवी या दोन भक्ती स्थळांना जोडण्याची तरतूद महाराष्ट्र शासनाकडून निधीद्वारे मंजूर करून घेतली.

# स्नेहाचे ऋणानुबंध चिरकाल टिकावेत : रक्षाबंधन!

श्रावणमास पर्व हे समाज जीवनाचे प्रतिबिंब आहे. रक्षाबंधन हे एक सामाजिक व धार्मिक पर्व आहे. हे पर्व सामाजिक परंपरेमध्ये सद्भाव, स्नेह, आत्मियता, बंधुभाव, कौटुंबिक एकात्मता यांचा प्रवाह निर्माण करणारे आहे. खऱ्या अर्थाने संस्कृतीला समृध्द बनविणारे, आध्यात्मिक स्पर्शाने जनमनाला पुलंकित करणारे पर्व आहे, रक्षाबंधन पर्व! राणी कर्णावतीने आपल्या रक्षणासाठी हुमायुँ राजाला भाऊ मानून बांधलेली राखी इतिहासाच्या पानावर कोरल्या गेली. हिंदू-मुस्लिम यांच्यामधील स्नेह व एकी निर्माण करणारी ही जीवंत साक्षच आहे. 'स्त्री' जातीच्या रक्षणासाठी धर्म, जाती, लिंग या भेदांना छेदून पुढे टाकलेले एक पाऊल आहे हे! राष्ट्रीय एकात्मेला पोषक व वर्धक प्रसंग समाजात सद्भावना व सत्प्रवृत्तींचे पोषण करण्याचे कार्य करतात. आपल्या भाऊरायाला बहीण राखी बांधते व आपल्या रक्षणाची अप्रत्यक्षरीत्या हमी घेते. हिंदू संस्कृतीतील समाजमुल्यांचे पोषण करणारी ही सामाजिक परंपरा आजही मोठया दिमाखाने देशात सर्वत्र नांदतांना दिसत आहे.

हिंदू पौराणिक कथेनुसार, महाभारतात, जे एक महान भारतीय महाकाव्य आहे, पांडवांची पत्नी द्रौपदीने भगवान श्रीकृष्णाच्या मनगटामधून वाहणारे रक्त थांबवण्यासाठी तिने तिच्या साडीचा कोपरा फाडून त्याच्या मनगटावर बांधला. त्यामुळे भगवान श्रीकृष्ण यांच्यात एक बंध निर्माण झाला आणि द्रौपदीचे रक्षण करण्याचे वचन त्यांनी तिला दिले. राखी बांधताना बहिणीने म्हणावे, ङ्गयेन बद्धो बली राजा दानवेन्द्रो महाबलः। तेन त्वामनुबध्नामि रक्षे मा चल मा चलङ्घ (दानवांचा राजा बली यांच्या हातात दैत्यगुरू शुक्राचार्य यांनी जशी रक्षा (राखी) बांधली होती तशीच ही राखी मी तुझ्या हाताला बांधत आहे)

रक्षाबंधनाची सुरुवात केव्हा झाली, याबद्दल निश्चित पुरावा नाही; पण त्याविषयी एक आख्यायिका आहे. पूर्वी देवदानवांच्या युद्धात दानवांच्या शक्तीपुढे देवांचे काही चालत नसे. दानवांचा राजा वृत्रासुर याने देवांचा राजा इंद्र याला युद्धाचे आव्हान दिले. इंद्र आपले वज्र घेऊन युद्धास निघाला. त्या वेळी इंद्राला विजय मिळावा म्हणून त्याची पत्नी शुची हिने विष्णूकडुन मिळालेला एक दोरा (राखी) इंद्राच्या हातावर बांधला. त्या राखीच्या प्रभावाने इंद्राला त्या युद्धात विजय मिळेल, अशी तिची श्रद्धा होती. शेवटी श्रध्दा खरी ठरली आणि इंद्राचा विजय झाला आणि त्याचे गेलेले वैभव परत मिळाले. या प्रसंगाची आठवण म्हणून मनगटावर राखी बांधण्याची पद्धत पडली, असे सांगितले जाते.

हिंदू पंचांगाप्रमाणे श्रावणात येणारी राखी पौर्णिमा ही नारळी पौर्णिमेच्या दिवशी किंवा पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर दुसऱ्या दिवशी असणाऱ्या पौर्णिमेला साजरी करतात. याच दिवसाला 'रक्षाबंधन' म्हणतात. या दिवशी रक्षाबंधनाचा कार्यक्रम असतो. हा सण बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा दिवस आहे. श्रावण पौर्णिमेस राखी बांधावी, असे धर्मशास्त्रात म्हणले आहे. या विधीस 'पवित्रारोपण' असेही म्हणतात. भावाचा उत्कर्ष व्हावा, आपल्या भावाने आपले रक्षण करावे, ही यामागची मंगल मनोकामना असते. उत्तर भारतात हा सण राखी म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून ङ्गभावास दीर्घ आयुष्य व सुख लाभो मिळोङ्घ अशी कामना करतात. राखी बांधण्याचा अर्थ ती बांधणाऱ्या व्यक्तीच्या प्रेमरूपी बंधनात स्वतः ला गुंतवून त्या व्यक्तीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारणे. राखी बांधण्याच्या या सणातून स्नेह व परस्परप्रेम वृद्धिंगत करण्याची प्रथा अस्तित्वात आली आहे. रक्षाबंधन म्हणजे हातातील राखीस साक्षी मानून आपल्या बहिणीचे सदैव रक्षण करण्याचे वचन देणे. काही प्रांतात नोकर आपल्या मालकाला, ब्राह्मण आपल्या यजमानाला, मुलगी आपल्या वडिलांना, आणि पत्नी नवऱ्याला राखी बांधते. आपल्यापेक्षा बलवान, समर्थ माणसाला राखी बांधून आपल्या रक्षणाचे वचन घेणे हीच यामागची भावना आहे. भारतीय समाजात ऐक्य आणि प्रेमभाव वाढीस लागावा यासाठी रक्षाबंधनाचा सण राजपूत लोकांत रूढ झाला.

आजकाल मात्र बहीण-भावाच्या पवित्र प्रेमाचा सण म्हणून हा सण साजरा होतो. या दिवशी बहिणी आपल्या सख्ख्या भावाच्या हातावर राखी बांधतातच आणि शिवाय त्या बंधुत्वसमान नाते असलेल्या व्यक्तीसही राखी बांधतात.

उत्तर भारतातील ग्रामीण भागांत जिथे अनेक खेड्यांमध्ये बहिर्विवाह पद्धती प्रचलित आहे, तिथे मोठ्या संख्येने विवाहित हिंदू स्त्रिया दरवर्षी त्यांच्या पालकांच्या घरी सणासाठी परत जातात. त्यांचे भाऊ, जे विशेषतः पालकांसोबत किंवा जवळपास राहतात, कधीकधी त्यांच्या बहिणींच्या विवाहित घरी त्यांना परत घेऊन आणण्यासाठी जातात. अनेक तरुण विवाहित स्त्रिया त्यांच्या जन्माच्या घरी काही आठवड्यांपूर्वी येतात आणि समारंभ होईपर्यंत राहतात. भाऊ हे बहिणीचे सासर आणि माहेर यांच्यामध्ये आजीवन मध्यस्थ म्हणून काम करतात. शहरी भारतात जिथे कुटुंबे अधिकाधिक विभक्त होत आहेत, तिथे हा सण अधिक प्रतीकात्मक बनला असला तरीही तो खूप लोकप्रिय आहे. या उत्सवाशी संबंधित विधी त्यांच्या पारंपारिक प्रदेशांच्या पलीकडे पसरले आहेत. तंत्रज्ञान, स्थलांतर, चित्रपट, सामाजिक संवाद, आणि हिंदू धर्माच्या राजकीय प्रचाराद्वारे या सणाचे स्वरूप बदलले जात आहे. रक्ताचे नाते नसलेल्या स्त्रिया आणि पुरुषांमध्ये स्वैच्छिक नातेसंबंधांची एक बदललेली परंपरा देखील आहे. यासाठी जाती आणि वर्गाच्या पलीकडे, तसेच हिंदू आणि मुस्लिम हा भेद विसरून राखी बांधली जात आहे.

जैन परंपरेमध्ये सातशे मुनींवर दृष्ट प्रवृत्तीने केलेल्या उपसर्गाला दुर करण्याचे कार्य या पर्वमध्ये झाले. जैन लोक रक्षाबंधनाच्या दिवशी जैन मंदिरात जाऊन अभिषेक-पूजन करुन मुनीं प्रती हृदयभाव ठेवून पंडित-पुजाऱ्यांच्या हस्ते राखी बांधून हे पर्व साजरे करतात. धर्मरक्षणाचे चकं कण आहे ते ! प्रथम धार्मीक व नंतर सामाजिक दायित्व पार पाडले जाते. हे पर्वधर्म व धर्मावलय यांच्येशी मातृत्व भावनेतून जोडणारे आहे. संस्कृती व धर्म समर्पणाच्या भावनेला वृध्दिगत करणारे आहे. श्रमण संस्कृतिमध्ये रक्षाबंधनाचे आगळे वेगळे वैशिष्ट्य आहे. ईश्वरप्रती सम र्पणाची भावना व संस्कृतिचा अत्यंत आदरया भावनांना श्रेष्ठस्थान दिले गेले आहे. सामाजिक दृष्टिकोनातून रक्षाबंधन हे वात्सल्य व बंधुभावाचे परिपाक पर्व आहे. बंधुभाव व स्नेहवर्धनाचे पाठया पर्वामुळे गिरविले जातात. समाज व धर्म या पेक्षाश्रेष्ठ आहे राष्ट्रधर्म ! म्हणून सामाजिक व धार्मीक अस्तित्व टिकविण्याची आज राष्ट्राचे अस्तित्व टिकविण्याची, त्याचे जतन करण्याची गरजभासत आहे. ही महान जबाबदारी आज आपणांवर आहे. ती नेटाने करणे गरजेचे आहे, त्यामुळेही घडी नीट घट्ट बसेल.

आलमगीर बादशहा दिल्लीवर राज्य करीत होता. त्याच्या प्रधानाने कट आखून बादशहाचा खून केला व प्रेत नदीत टाकून दिले. एका स्त्रिने ते पाहिले. प्रेत वाहून जाऊ नये म्हणून तिने प्रेत पाण्याबाहेर काढले आणि प्रेताचा वाली येईपर्यंत प्रेताजवळ बसून राहिली. बऱ्याच वेळानंतर बादशहाच्या शोधात सैनिक तेथे आले. बादशहाचा मुलगा शहाआलम याने त्या हिंदू स्त्रीचे आभार मानले. तिला आपली बहीण मानले. ती हिंदू स्त्री पुढे दरवर्षी शहाआलमला राखी बांधू लागली. ही प्रथा पुढे अकबरशहा व बहादूरशहा यांनीही चालू ठेवली. इतिहासात याचा उल्लेख आहे. मुघल बादशहानी पवित्र म ानलेला हिंदूंचा हा एकमेव सण आहे.

या श्रावण पौर्णिमेला 'पोवती पौर्णिमा' असेही म्हणतात. कापसाच्या सुताच्या नवसुती (नऊ धाग्यांची जुडी) करून तिला आठ-बारा किंवा चोवीस गाठी मारतात व त्यांच्या ठिकाणी ब्रह्मा, विष्णू, महेश, ओंकार, सूर्य इत्यादी देवतांचे आवाहन करून हे पोवते प्रथम देवास वाहून नंतर तसलीच पोवती कुटुंबातील माणसांच्या मनगटावर बांधली जातात. रक्षाबंधनाच्या निमीत्ताने पर्यावरणाचे रक्षण, ऑलिम्पिक खेळाडूंना शुभेच्छा आणि स्त्रीभृणहत्या रोखण्याचा संदेश राखीच्या माध्यमातून करण्याचा निर्धार भाऊ-बहिण आणि समस्त भारतीयांनी या नाजुक पर्वावर केला पाहिजे. रक्षाबंधन निमित्त सर्व बंधु-भगिनींना मन:पूर्वक शुभेच्छा!

**– प्रविण बागडे**

# संस्कृत भाषेची निर्मिती, व्याप्ती आणि महत्त्व!

**दरवर्षी** श्रावण पौर्णिमेला 'संस्कृत दिन' ही साजरा केला जातो. संस्कृत ही ईश्वरानेच निर्माण केलेली भाषा आहे. जगातील सर्वच भाषांची ती जननी आहे. संस्कृतचे महत्त्व आज पाश्चात्त्यांनीही ओळखले आहे. पाश्चात्त्य संगणकशास्त्रज्ञ अशा भाषेच्या शोधात होते की, जिचा संगणकीय प्रणालीत वापर करून, तिचे जगातील कोणत्याही आठ भाषांत तत्क्षणीच रूपांतर होईल. त्यांना तशी भाषा संस्कृत'च आढळली. संस्कृत ही संगणकीय प्रणालीसाठी उपयुक्त असणारी जगातील सर्वोत्तम भाषा आहे. वेद, उपनिषदे, गीता आदी मूळ धर्मग्रंथ संस्कृतमध्ये आहेत. ज्या देववाणी संस्कृतने मानवाला ईश्वरप्राप्तीचा मार्ग दाखवला, त्या देववाणीलाच कृतघ्न मानव विशेषतः स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील अनेक राजकीय नेते नष्ट करायला सरसावले आहेत, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. हे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी प्रत्येकानेच प्रयत्न केले पाहिजेत. संस्कृत भाषेचे सौंदर्य आणि थोरवी कळली पाहिजे या निमित्ताने हा लेख प्रपंच !

**१. संस्कृत भाषेची निर्मिती !**

'संस्कृत' भाषा कशी तयार झाली, ते सांगतांना पाश्चात्त्यांच्या नादी लागलेले काही जण म्हणतात, 'पहिल्यांदा मानवाला 'आपल्या तोंडातून ध्वनी येतात', हे कळले. त्या ध्वनींच्या खुणा, खुणांची चिन्हे आणि त्या चिन्हांचीच अक्षरे झाली. त्यातून बाराखडी, वस्तूंची नावे, अशा तर्हेने सर्व भाषा, अगदी संस्कृत भाषाही निर्माण झाली.' अर्थात हे सर्व खोटे आहे. ईश्वराच्या संकल्पाने ही सृष्टी निर्माण झाली. मानवाच्या निर्मितीनंतर मानवाला आवश्यक ते सर्व काही त्या ईश्वरानेच दिले. एवढेच नव्हे, तर मानवाला काळाप्रमाणे पुढे ज्याची आवश्यकता भासेल, तेही द्यायची त्याने व्यवस्था केली आहे. सृष्टीच्या निर्मिती पूर्वीच ईश्वराने मनुष्यप्राण्याला मोक्षप्राप्ती साठी उपयोगी पडणारी आणि चैतन्याने ओतप्रोत भरलेली अशी एक भाषा निर्माण केली. या भाषेचे नाव आहे 'संस्कृत'.

**२. प्रचंड शब्द भांडार असलेली भाषा**

'स्त्री' या शब्दाकरता नारी, अर्धांगिनी, वामांगिनी, वामा, योषिता, असे अनेक शब्द संस्कृत मध्ये आहेत. हा प्रत्येक शब्द स्त्रीची सामाजिक, कौटुंबिक आणि धार्मिक भूमिका दर्शवतो. संस्कृत भाषेचे शब्दभांडार एवढे प्रचंड आहे की, त्याची माहिती घ्यायला एक आयुष्य पुरे पडणार नाही.'

**३. एका प्राण्याला, वस्तूला आणि देवाला अनेक नावे असलेली संस्कृत भाषा ! '**

संस्कृतमध्ये प्राणी, वस्तू इत्यादींना अनेक नावे देण्याची प्रथा होती, उदा. बैलाला बलद, वृषभ, गोनाथ अशी ६० च्या वर; हत्तीला गज, कुंजर, हस्तिन, दंतिन, वारण अशी १०० च्या वर; सिंहाला वनराज, केसरीन, मृगेंद्र, शार्दूल अशी ८० च्या वर; पाण्याला जल, जीवन, उदक, पय, तोय, आप; सोन्याला स्वर्ण, कांचन, हेम, कनक, हिरण्य आदी नावे आहेत.' सूर्याची १२ नावे, विष्णु सहस्त्रनाम, गणेश सहस्त्रनाम काही जणांना पाठही असतात. त्यातील प्रत्येक नाम त्या त्या देवतेचे एकेक वैशिष्ट्यच सांगते.

**४. वाक्यातील शब्द मागेपुढे केले, तरी अर्थ न बदलणे!**

वाक्यात शब्द कोठेही असले, तरी वाक्याचा अर्थ बदलत नाही, उदा. 'रामः आम्रंखादति ।' म्हणजे 'राम आंबा खातो', हे वाक्य पुढीलप्रमाणे कसेही लिहिले, तरी अर्थ तोच रहातो – 'आम्रं खादति रामः ।' 'खादति रामः

**पान ३ वर**

# अनुदानित खतांची विक्री ई-पॉस प्रणालीद्वारे करणे बंधनकारक; २६ कृषी सेवा केंद्रांवर कारवाई

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

कृषी सेवा केंद्रचालकांनी अनुदानित खतांची शेतकऱ्यांना विक्री करतांना ती डिजीटल विक्री यंत्र अर्थात ई-पॉस प्रणालीद्वारे करणे बंधनकारक आहे. कृषी विभागाने जिल्ह्यातील २६ कृषी सेवा केंद्रांची तपासणी केली असता त्यांनी ऑफलाईन पद्धतीने खतांची विक्री केली असल्याने झालेली विक्री व साठा यात तफावत आढळून आल्यामुळे कारवाई करण्यात आली आहे, अशी माहिती कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर प्रकाश पाटील यांनी दिली आहे.

शेतकऱ्यांनी देखील अनुदानित खते खरेदी करताना ऑनलाईन पद्धतीचा अवलंब करावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख यांनी केले आहे.

यासंदर्भात सविस्तर माहिती अशी की, अनुदानित खत युरिया, म्युरेट ऑफ पोटॅश, डीएपी, १०-२६-२६ यांची विक्री ई-पॉस प्रणाली मार्फतच करण्याच्या केंद्र शासनाच्या सूचना आहेत. किरकोळ खत विक्रेत्यांना ई-पॉस प्रणालीवर अनुदानित खत प्राप्त झाल्यानंतरच खतांची विक्री शेतकऱ्यांना ऑनलाईन पद्धतीने करता येणार आहे.

कृषी विभागाने केलेल्या तपासणीत असे निर्देशनास आले की, कृषी सेवा केंद्र संचालक अनुदानित खतांचा साठा ई-पॉस प्रणालीवर येण्याच्या अगोदरच शेतकऱ्यांना ऑफलाईन पद्धतीने विक्री करत आहेत व त्यासाठी ई-पॉस मशीन बंद आहे अशी सबब देतात. अनुदानित खतांची विक्री ई-पॉस शिवाय करणे ही गंभीर बाब आहे. ऑफलाइन पद्धतीने विक्री केल्यामुळे कृषी सेवा केंद्रातील ई-पॉस प्रणाली व प्रत्यक्ष खत साठ्यात तफावत आढळून येत आहे. प्रधान सचिव कृषी यांनी बाबत अनुदानित खतांची विक्री ही ऑनलाईन पद्धतीने ई-पॉस प्रणालीद्वारेच करावी असे सक्त निर्देश देण्यात आले आहे. कृषी विभागामार्फत जिल्ह्यातील सर्व तालुक्यात कृषी सेवा केंद्राची तपासणी मोहिम राबविण्यात आली ई-पॉस प्रणालीवरील खताचा साठा व कृषी सेवा केंद्रातील खतांचा प्रत्यक्ष साठा पडताळणी करण्यात आली. त्याअंतर्गत जिल्ह्यातील एकूण २६ कृषी सेवा केंद्रांवर कार्यवाही करण्यात आली.

**कार्यवाही करण्यात आलेले कृषी सेवा केंद्र**

उत्कर्ष कृषी सेवा केंद्र दहेगाव बंगला, ता.गंगापूर, मेहराज एजन्सी दहेगाव बंगाल ता.गंगापूर, किसान एजन्सी दहेगाव बंगला ता.गंगापूर, हरी ओम कृषी सेवा केंद्र, दहेगाव बंगला ता.गंगापूर, सदगुरु ॲग्रो सर्व्हिस दहेगाव बंगला ता.गंगापूर, तिरुपती कृषी सेवा केंद्र, बाबरा ता. फुलंब्री, स्वराज कृषी सेवा केंद्र, ता.फुलंब्री, विश्वास ॲग्रो सर्व्हिस बालानगर ता. पैठण, न्यू जय भोले कृषी सेवा केंद्र, जोडवाडी ता. छत्रपती संभाजीनगर, गौरी कृपा कृषी सेवा केंद्र करमाड ता. छत्रपती संभाजीनगर, मृदा संजीवनी शेती साहित्य गांधेली ता. छत्रपती संभाजीनगर, नागेश्वर कृषी सेवा केंद्र, बाबरा ता.फुलंब्री, माऊली कृषी सेवा केंद्र देवगाव रंगारी ता. कन्नड, विशाल कृषी सेवा केंद्र, वाकोद ता.फुलंब्री, संतोष कृषी सेवा केंद्र धोंदलगाव ता. वैजापूर, श्री. सदगुरु कृपा कृषी सेवा केंद्र बालानगर ता. पैठण, मराठवाडा कृषी सेवा केंद्र जटवाडा ता. छत्रपती संभाजीनगर, हरी ओम ट्रेडर्स जटवाडा ओव्हर ता. छत्रपती संभाजीनगर, अमृतीी ॲग्रो एजन्सी विहामांडवा ता. पैठण, आर. के. ॲग्रो शरणापूर ता. छत्रपती संभाजीनगर, नाथ कृषी उद्योग गारज ता.वैजापूर, ओम साई ट्रेडर्स खंडाळा ता. वैजापूर, आदर्श कृषी सेवा केंद्र, जाधववाडी ता. छत्रपती संभाजीनगर, गणेश कृषी सेवा केंद्र ता. कन्नड.

ई-पॉस प्रणालीवर वरुन विक्री न केल्याने कृषी सेवा केंद्राच्या ई-पॉस प्रणालीवर जास्त खत साठा तसेच प्रत्यक्ष कृषी केंद्रावर कमी खत साठा अशी परिस्थिती निर्माण होते व त्याचा परिणाम जिल्ह्याच्या खत पुरवठ्याच्या मागणीवर होतो. केंद्र शासनामार्फत करण्यात येणारा खत पुरवठा ई-पॉस प्रणालीवर उपलब्ध असलेल्या खत साठ्याच्या अनुषंगाने करण्यात येतो.

कृषी सेवा केंद्रांनी ई-पॉस प्रणालीवर खत उपलब्ध झाल्यानंतरच प्रत्यक्ष शेतकऱ्यांना खतांची विक्री करावी. कृषी सेवा केंद्र यांनी ऑफलाईन पद्धतीने खताची विक्री करु नये, तसे आढळल्यास खत नियंत्रण कायदा १९८५ व अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत कार्यवाही करण्यात येईल,असा इशारा जिल्हा परिषदेच कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख यांनी दिला आहे.

# मृत्यूनंतर अवयवदानाने दिले तिघांना जीवनदान





अवयवदानाच्या महान कार्यानंतर, कमलनयन बजाज रुग्णालयाच्या वतीने किशोर राठी यांना मानवंदना देण्यात आली. रुग्णालयातील वैद्यकीय आणि प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी सर्व जण राठी कुटुंबियांच्या दुःखात सहभागी झाले.

**'एक निर्णय – तीन जीवन!'**

तुमचाही एक निर्णय, अनेकांना जीवनदान देऊ शकतो. त्यामुळेच आपण सर्वांनी या सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून, अवयवदानासाठी पुढे यावे.

**'मरणोत्तर जीवनाचा दीप उजळवा – अवयवदान करा!'**

कमलनयन बजाज रुग्णालयाच्या वतीने जनजागृतीसाठी आवाहन केले आहे.

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

इचलकरंजी येथून पाच वर्षांपूर्वी छत्रपती संभाजीनगरमध्ये स्थायिक झालेले किशोर राठी हे अवघ्या ६० व्या वर्षी या जगाचा निरोप घेतानाही अवयवदानाने तीन जणांना जीवनदान देत एक प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.

दिनांक ४ ऑगस्ट २०२५ रोजी किशोर राठी हे शाहनूरमिया दर्गा परिसरातून दुचाकीवर जात असताना त्यांना अचानक चक्कर आली, पादचाऱ्यानी कळवल्यानंतर नातेवाईकांनी तातडीने त्यांना कमलनयन बजाज रुग्णालयात दाखल केले.

मेंदूत मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला होता आणि डॉक्टरांनी त्यांना ब्रेन डेड घोषित केले. या अत्यंत दुःखद प्रसंगी, डॉ. गोसावी यांनी राठी यांच्या नातेवाईकांशी चर्चा करत, त्यांच्या अवयवदानामुळे इतर रुग्णांना जीवनदान मिळू शकते, असे सांगितले. याला सकारात्मक प्रतिसाद देत त्यांच्या पत्नी सुनीता राठी, दोन मुले ऋषिकेश व प्रथमेश आणि विजय, प्रकाश, विष्णुदास, घनश्याम राठी या चार भावांनी एकमताने अवयवदानासाठी परवानगी दिली. या निर्णयानुसार, शहरातील कमलनयन बजाज रुग्णालयातील एका रुग्णाला एक किडनी, तर एमजीएम रुग्णालयातील एका रुग्णाला दुसरी किडनी प्रत्यारोपित करण्यात आली.

तसेच त्यांचे लिव्हर नागपूर येथील न्यू एरा मदर अँड चाईल्ड रुग्णालयात पाठवण्यात आले. अशा प्रकारे, त्यांच्या निधनानंतर तीन रुग्णांना नवजीवन मिळाले. कमलनयन बजाज रुग्णालयातील सर्जन डॉ ओसवाल आणि डॉ. शिवाजी तौर, अतिदक्षता विभागातील (ICU) तज्ञ डॉ. विनोद गोसावी, डॉ गीता फेरवानी, मेडिकल डायरेक्टर डॉ. अजय रोटे, सिनिअर कन्सलटंट डॉ. मिलिंद वैष्णव आणि सीईओ डॉ. जॉर्ज फर्नांडीस यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य या कार्यात मोलाचे ठरले.

# मुंबईत वक्फ बोर्ड कार्यालयात दर्गा कमिटी सोबत बैठक पडली पार यावर्षी उर्स मैदानाचा लिलाव रद्द करण्याचा निर्णय

**खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद शहरात हजरत ख्वाजा शेख मुन्तजीबोद्दीन जरजरी जरबक्ष रह. यांच्या उर्स २७ ऑगस्ट पासून सुरू होत आहे या अनुषंगाने मुंबई येथे आज महाराष्ट्र वक्फ बोर्डाच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयात बुधवारी चेअरमन समीर काजी यांच्या अध्यक्षतेखाली दर्गा कमिटीच्या प्रतिनिधींशी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी वक्फ बोर्डाचे सदस्य सलीम हाश्मी, एम. यू. पठाण, तसेच दर्गा कमिटीचे अध्यक्ष एजाज अहमद, उपाध्यक्ष इमरान जहांगीरदार, सदस्य ॲड. कैसरोद्दीन उपस्थित होते.दर्गा कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी समीर काजी यांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आणि त्यांच्या कार्यकौशल्याचे कौतुक केले. वक्फ बोर्डाकडून ही बैठक बोलावण्यात आली होती. बैठकीत हजरत ख्वाजा शेख मुन्तजीबोद्दीन जरजरी जरबक्ष रह. यांच्या उर्स आयोजनासंदर्भात सविस्तर चर्चा झाली.

उर्स काळात महाराष्ट्रा सह अन्य राज्यांमधून अनेक व्यापारी येत असतात.याच कालावधीत दर्ग्यातील खुद्दामीन ही व्यवसाय करत असल्याने स्थानिक व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याच्या पार्श्वभूमीवर यंदा उर्स मैदानाची लिलाव प्रक्रिया रद्द करण्यात येणार असल्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काजी आणि सदस्य सलीम हाश्मी यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की,यावर्षी लिलाव न घेता पुढील वर्षासाठी उर्स मैदानाच्या नियोजनासाठी स्वतंत्र बैठक घेण्यात येईल.दर्गा कमिटी व उरूस व्यवस्थापन समितीने नागरिक व व्यापाऱ्यांना कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. यावेळी विविध कागदपत्रांवर चर्चा झाली असून सर्व प्रलंबित खटल्यांबाबत सकारात्मक वातावरणात संवाद साधण्यात आला. भविष्यात वक्फ बोर्डा मार्फत पूर्ण सहकार्य दिले जाईल, असे आश्वासन समीर काजी यांनी दिले. बैठकीच्या यशस्वी आयोजनासाठी दर्गा कमिटीच्या वक्फ प्रतिनिधी टीमचे विशेष आभार मानण्यात आले.

# ज्याला आपले दुःख कळते त्यांचाच हातात हात घालून चालावंः बागडे



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

सुखात जगणाऱ्यांना तुमच्या भावना, दुःखासी काही देणे घेणे नाही तो फक्त आपली संधी कशी साधून घेईल याची वाट बघत असतो मग अशांच्या मागे धावत सुटण्या पेक्षा जे आपले दुःख समजू शकतो असा मानसिकतेने तयार झालेल्यांच्या हातात हात घालून चाललेल कधी हि बर असे आवाहन आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी केले ते प्रख्यात साहित्यिक अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित बौद्ध, मातंग ऐक्य मिलन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वीणा इंगोले ह्या होत्या तर विशेष अतिथी म्हणून माजी पुरातत्व अधिक्षक नामदेवराव निकोसे, अँड मिलिंद खोब्रागडे, माजी बॅंक अधिकारी रवी वाघमारे, धर्मा बागडे, आदिवासी नेते मारोतराव कोडवते, माजी नगरसेविका अश्विनी जिचकार, मातंग समाजाचे युवा नेते विनायक इंगोले हे होते.

कार्यक्रमाचे आयोजन मनोहरराव इंगोले,सचिन इंगोले, सुभाष मेश्राम,श्रिकांत भावे यांनी केले होते.

या प्रसंगी समाजातील विद्यार्थ्यी, कलावंत, प्रसुती बाळंतपण करणाऱ्या महिला आणि संगीत क्षेत्रातील मान्यवरांच्या सत्कार प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते करण्यात आला.प्रथम कार्यक्रमाच्या अध्यक्षा वीणा इंगोले यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले तर सुरज ढोणे यांनी दिपप्रज्वलन केले सीता बाई वानखेडे यांनी तथागत गौतम बुद्ध, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रमेश दुपारे यांनी केले तर आभार प्रदर्शन मारोतराव कोडवते यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शालिक बांगर, रमेश डहका,असुल वानखेडे, गणेश पाट,शिंगारे, अतुल इंगोले, मधूकर इंगोले, पुष्पा इंगोले, बेबी बाई इंगोले, बाबुजी सोनटक्के, नारायण कांबळे यांनी परिश्रम घेतले असे पुण्यशील बोदिले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळिवले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199